सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन या संगणक प्रणाली करिता State Scheme Manager आणि First Level Agency घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्यांक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : अविवि-२०१९/प्र.क्र.१३७/का-६
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०१९

वाचा: -

१. वित्त विभागाचा शासन निर्णय क्रं. संकीर्ण २०१४/प्र.क्र.२९/कोषा प्रशा -५ दिनांक १७-१०-२०१६
२. वित्त विभागाचे क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. ११/कोषा प्रशा-४ दिनांक ९-६-२०१७ चे पत्र
३. सह संचालक (सुधारणा) संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांचे क्र संलको-पीएफएमएस नस्ती क्र.२/५८ दिनांक १२-०७-२०१७ चे पत्र

प्रस्तावना:-

केंद्र शासनामार्फत, केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी राज्याच्या एकत्रित निधीमधे जमा होतो. सदरचा निधी राज्य शासनाच्या संबंधित योजना राबविणाऱ्या विभागाने राज्याच्या हिश्श्यासह अर्थसंकल्पीत केल्यानंतर, BEAMS प्रणालीद्वारे संबंधित योजना राबविणाऱ्या विभागांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांना वित्त विभागामार्फत प्राप्त होतो. संबंधित नियंत्रक अधिकारी योजना उद्दिष्टाप्रमाणे आहरण व संवितराण अधिकाऱ्यांना BEAMS द्वारे योजनेचा निधी वितरीत करतात. आहरण व संवितरण अधिकारी संबंधित निधीचे कोषगारातून देयक आहरीत करुन त्याच्या बॅक खात्यात रक्कम जमा करुन योजना उद्दिष्टाप्रमाणे धनादेशाद्वारे किंवा RTGS / NEFT द्वारे संबंधित पुरवठादार / लाभार्थी यांना निधी वितरीत करतात. PFMS प्रणालीमध्ये संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे बँक खाते नोंदविण्याची प्रक्रिया केल्यानंतर अत्यंत सोप्या व सुटसुटीत पद्धतीने संबधित मक्तेदारास / लाभार्थी यांना रकमेचे प्रदान करणे शक्य होते. त्याचा हिशोब सुद्धा प्रणालीवर सदर योजनांचे प्रशासकीय नियंत्रण ठेवणाऱ्या सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांना तात्काळ दिसून येतो. त्यामुळे राज्यामध्ये PFMS प्रणाली राबविणे अनिवार्य आहे. या शासनाच्या धोरणानुसार अल्पसंख्यांक विकास विभागाच्या केंद्र पुरस्कृत योजना व राज्य शासन पुरस्कृत योजनांकरिता सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) या पद्धतीचा अवलंब करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. सदर प्रणालीच्या अमंलबजावणीकरिता नोडल अधिकारी, State Scheme Manager (SSM) व First Level Agency घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सार्वजनिक वित्तिय व्यवस्थापन प्रणालीच्या (PFMS) अमंलबजावणीकरिता एक नोडल अधिकारी, प्रत्येक केंद्र पुरस्कृत व केंद्र सहाय्यीत योजनांकरिता State Scheme Manager (SSM) व First Level Agency घोषित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

या अनुषंगाने अल्पसंख्यांक विकास विभागाच्या केद्र पुरस्कृत योजना व राज्य शासन पुरस्कृत योजनांकरिता, अवर सचिव अर्थसंकल्प यांना State Scheme Manager (SSM) व कक्ष अधिकारी, का.क्र.६, अल्पसंख्यांक विकास विभाग यांना First Level Agency घोषित करण्यात येत आहे :-

अ.क्र.	योजनेचे नाव व सांकेतांक क्रमांक	State Scheme Manager (SSM)	First Level Agency
१.	उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना संगणक संकेतांक (२२३५ए ३३८)	अवर सचिव, (अर्थसंकल्पिय शाखा) अल्पसंख्यांक विकास विभाग	कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग

State Scheme Manager (SSM):- अल्पसंख्यांक विकास विभागाचे अवर सचिव (अर्थसंकल्पिय शाखा) हे State Scheme Manager (SSM) म्हणून काम पाहतील. त्यांनी प्रत्येक केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजना राबविण्यासाठी राज्य स्तरावर First Level Agency निर्माण करुन त्यांचा प्रशासक म्हणून त्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी यांची नेमणूक करावयाची आहे.

First Level Agency:- कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग हे First Level Agency म्हणून काम पाहतील. निधी वितरणाच्या कार्यप्रणालीनुसार त्यांचे अधिनस्त कार्यालयीन संस्था यांना PFMS प्रणालीद्वारे Second Level Agency म्हणून नोंदवून निधी वितरीत करतील.

Second Level Agency:- संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई; संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई आणि संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे. हे Second Level Agency चे प्रशासक राहतील. Second Level Agency च्या प्रशासकांनी PFMS प्रणालीमार्फतच पुरवठादार / लाभार्थी इत्यादींना थेट संबंधितांच्या बँक खात्यात रक्कम प्रदान करणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०८०२१३२३३८१०१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यापाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2fde30534317da1ea9bdb3e7bec3c1084d5d608a86e993f8ac0fa02331b77751, serialNumber=b469b3fd61b5201f03b702c0f7fd0ec5cf18beb12425455f4856f44e3d4da763, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2019.08.02 16:43:28 +05'30'

(सं. छ. तडवी)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, शासकीय दंत महाविद्यालय व रूग्णालय इमारत, ४ था मजला, मुंबई-४०० ००१.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. संचालक (लेखा व कोषागारे), मुंबई

७. सह संचालक (सुधारणा) (PFMS), संचालनालय लेखा व कोषागारे,नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई
८. सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (कोषा-४), मंत्रालय, मुंबई
१०. तज्ज्ञ वरिष्ठ वित्तिय सल्लागार, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. राज्य नोडल अधिकारी, पीएफएमएस
१२. निवड नस्ती (का.६).